'जनसामान्यांच्या प्रश्नांची जाणीव असलेला नेता हरपला'
पनवेलमधील शोकसभेत  आर. आर. आबांना आदरांजली
पनवेल :पनवेल

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आर. आर. पाटील अत्यंत गरीब कुटूंबातून पुढे आलेले अभ्यासू नेतृत्व होते. त्यांनी ग्रामीण जनतेच्या प्रश्नांची जाणीव होती. त्यांना गरीब दीन दुबळ्या  जनतेविषयी आपुलकी होती. त्यांच्या दुर्दैवी निधनामुळे जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला नेता हरपला आहे. असा शोक आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

आर. आर. पाटील यांच्या निधनामुळे राज्यातील जनतेला तीव्र दु:ख झाले असून सर्वत्र शोक व्यक्त होत आहे. पनवेल येथे गुरूवारी (दि.१९) व्ही.के. हायस्कूलमध्ये सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी आर. आर. पाटील यांना भावपुर्ण आदरांजली अर्पण करताना आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. या शोकसभेला भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील, नगराध्यक्षा चारूशीला घरत, नगरसेविका नीता माळी, जे. एम. म्हात्रे, श्याम म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस बाळाराम पाटील, माजी आमदार विवेक पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी आणि विविध पक्षाचे नगरसवेक उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेले आर. आर.पाटील यांचे पितृछत्र बालपणीच हरपले. त्यामुळे अतिशय प्रतिकूल परीस्थितीत त्यांनी रोजगार हमी योजनेवर काम करून आपले शिक्षण पुर्ण केले.  गरीबीची जाणीव व गरीबांबद्दलची कणव त्यांना होती. त्या जाणीवेतून त्यांनी अखंडपणे गरीबांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.त्यांना सर्वसामान्यांच्या प्रश्नांची चांगली जाण होती. जिल्हा परिषद सदस्य ते राज्याचा उपमुख्यमंत्री अशी नेत्रदिपक उंची त्यांनी गाठली. त्यांचा प्रत्येक निर्णय हा गरीबांच्या हिताशी, सामाजिक न्यायाशी निगडीत होता. आर. आर. पाटील हे राज्याच्या विधानसभेतील एक अभ्यासू दुरदृष्टी असलेले व्यक्तीमत्व होते. त्यांच्या निधनाने राज्याचे मोठे नुकसान झाले असून ही पोकळी कधीही भरून निघणार नाही.

या वेळी बोलताना नगराध्यक्षा चारूशीला घरत म्हणाल्या की, आर. आर. पाटील हे जनसामान्यांचे गोरगरीब जनतेचे प्रश्न आपुलकीने सोडविणारे व्यक्तीमत्व होते. त्यांनी विधीमंडळात घेतलेला लेडीज डान्सबार बंदीच्या निर्णयाने पनवेल उरण नवी मुंबईतील शेकडो हजारो कुटूंबाचा ऱ्हास होण्यापासून वाचविले आहे. संतगाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम अभियानाव्दारे ते घराघरात पोहचले. त्यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय हा गरीबांच्या हिताचाच होता. यावेळी इतर अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.